दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार १५ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३६५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये










# खुशखबर! लाडकी बहीण योजनेचा पहिला हफ्ता जमा होण्यास सुरुवात, अनेक महिलांच्या बँक खात्यात ३ हजार जमा

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पहिला हफ्ता मिळण्यास आता सुरुवात झाली आहे. या योजनेचा पहिला हफ्ता मुंबईतील महिलेला मिळाला आहे. मुंबईतील वरळी येथील महिलेच्या बँक अकाउंटमध्ये पहिल्या हफ्ता जमा झाला आहे. विशेष म्हणजे 9 ऑगस्टला या महिलेच्या बँक खात्यात 1 रुपया चाचपणीसाठी जमा झाले होते. यानंतर आज 14 ऑगस्टला 3 हजार रुपयांचा पहिला हफ्ता जमा झाला आहे. लातूर, धाराशिवमध्येही महिलांना लाडकी बहीण योजनेचा पहिला हफ्ता मिळण्यास सुरुवात झाली आहे. ज्या महिलांनी जुलै महिन्यात अर्ज भरले होते त्यांना दोन महिन्यांचे 3 हजार रुपये देण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे सिंधुदुर्गातही अनेक महिलांच्या बँक खात्यात लाडकी बहीण योजनेचा पहिला हफ्ता जमा होण्यास सुरुवात झाली आहे. सिंधुदुर्गातही लाडक्या बहीण योजनेचा पहिला हफ्ता अनेक बहिणींच्या खात्यात जमा झाला आहे. त्यामुळे महिलांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. एकदम दोन हफ्त्याचे तीन हजार खात्यात जमा झाले आहेत. योजनेचे पैसे बँक खात्यात जमा झाल्यानंतर कणकवलीत फटाके फोडून आनंद साजरा करण्यात आला आहे.मुख्यमंत्र्यांची महत्त्वाची प्रतिक्रिया राज्यातील काही लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात पैसे जमा झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. येत्या 17 ऑगस्टला 1 कोटी 2 लाख महिलांच्या बँक खात्यात




पैसे जमा होणार आहेत. याआधी काही महिलांच्या बँक खात्यात ट्रायल म्हणून 1 रुपये जमा करण्यात आले होते. त्याचाच एक भाग म्हणून महिलांच्या बँक खात्यात जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांचे पैसे जमा केले जात आहेत, अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. लाडकी बहीण योजनेचे पैसे महिलांच्या बँक खात्यात जमा होऊ लागल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मीडियाशी संवाद साधला. सध्या चेकींग सुरू आहे. त्यामुळे मोजक्याच महिलांच्या खात्यात पैसे टाकण्यात आले आहेत. 17 तारखेला पैसे ट्रान्स्फर करताना कोणत्याही अडचणी येऊ नयेत म्हणून आम्ही खबरदारी घेत आहोत. उद्या 17 तारखेला तांत्रिक अडचणीमुळे खात्यात पैसे गेले नाही तर तुम्हीच बोंब माराल. त्यामुळे आम्ही आजच हे पैसे पाठवायला सुरुवात केली आहे. ही ट्रायल रन सुरू असल्याने मोजक्याच महिलांच्या खात्यात पैसे आले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

## ठाकरेंच्या मतदारसंघातूनच सुरुवात

दरम्यान, लाडकी बहीण योजनेचे पैसे देण्याची सुरुवात आदित्य ठाकरे यांच्या वरळी मतदारसंघातूनच करण्यात आली आहे. वरळी मतदारसंघावर महायुतीचं प्रचंड लक्ष आहे. या विधनासभा निवडणुकीत आदित्य ठाकरे यांचा पराभव करण्यासाठी महायुतीने चांगलीच फिल्डिंग लावली आहे. त्यातच आता लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता वरळीत दिला गेल्याने त्याचे अनेक राजकीय अर्थ काढले जात आहे.



# अट्टल महाविद्यालयात महिला सक्षमीकरण कार्यक्रम

**गेवराई । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई येथील अंतर्गत तक्रार निवारण समिती महिला कक्ष, महिला बाल विकास कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्र शासनाकडून आयोजित शंभर दिवसांच्या मिशन शक्ती या योजने अंतर्गत महिलांसाठी जनजागृती आणि सक्षमीकरणाचा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. याप्रसंगी तालुका संरक्षण अधिकारी, शाम म्हस्के, समुपदेशक आश्विनी शेप आणि वैद्यकीय सहाय्यक कदीरा शेख यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात तालुका संरक्षण अधिकारी श्याम म्हस्के यांनी महिला विकास योजना, बाल विकास योजना, एकल पालक विद्यार्थ्यांसाठी असलेल्या योजना, लाडकी बहिण योजना अशा विविध योजनांबद्दल विद्यार्थिनींना माहिती दिली आणि या योजनांचा लाभ घेण्यासाठी योजनेच्या नियम आणि अटी समजावून सांगितल्या. समुपदेशक अश्विनी शेप यांनी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध तक्रार करण्यासाठी उपलब्ध असलेले हेल्पलाईन नंबर, शासकीय रुग्णालयातील वॉर्ड क्रमांक तसेच मोबाईल ॲप याबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी पिडीत महिलांसाठी कार्यरत असलेल्या सखी फाऊंडेशन बद्दल माहिती दिली. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनी, प्राध्यापक यांच्यासह मुलींच्या वसतिगृहाच्या ज्योती खरात आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला कक्ष प्रमुख डॉ. वृषाली गव्हाणे यांनी केले तर सूत्रसंचालन आणि आभार डॉ. सुदर्शना बढे यांनी मानले.

# परळी गंगाखेड मार्ग खोदल्याने नागरिकांचा जीव मुठीत धरून प्रवास-अँड.मनोज संकाये

## राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकारी साहेबांनी संबंधित गुत्तेदारास सूचना द्याव्यात!!

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी गंगाखेड मार्ग खोदल्यामुळे नागरिक आपला जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. आरोग्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करत आहेत. संबंधित राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकारी साहेबांनी आणि इतर अधिकाऱ्यांनी सूचना द्याव्यात व राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांमार्फत संबंधित गुत्तेदारांना रोड त्वरित पूर्ण करण्यास सूचित करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी केली आहे.



परळी गंगाखेड मार्गे अनेक प्रवासी प्रवास करतात. काही बस मधून तर काही आपल्या स्वतःच्या वाहनातून प्रवास करतात. दोन्हीही बाजूने हा रोड संबंधित गुत्तेदाराने खोदल्याने वाहनधारकांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागत असून परिसरात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. दोन्हीही बाजूने रोड खोदल्याने रोड मध्ये खड्डे पडले असून याच खड्ड्यात पावसाचे पाणी साचून हे खड्डे भरल्याने वाहनधारकांना वाहन चालवताना समजत नसल्याने वाहने घसरून अनेक नागरिक घाण पाण्यामध्ये पडून त्यांना शारीरिक इजा पोहोचत आहे. अपघाताचे प्रमाण वाढल्यामुळे संबंधित गुत्तेदाराने हा रोड त्वरित एका बाजूने पूर्ण करावा तसेच दुसऱ्या बाजूने वाहनधारकांना रोड रिकामा करून द्यावा अशी ही मागणी यांनी केली आहे. याच मार्गे न्यू हायस्कूल भेल सेकंडरी स्कूल या शाळेचे मुले प्रवास करतात त्यामुळे तेथे कसल्याही प्रकारची गतिरोधकाची व्यवस्था नाही. फलक लावलेले नाहीत त्यामुळे हा मार्ग अधिक धोकेदायक होत आहे त्यामुळे संबंधित राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांना सूचित करून त्यांच्या मार्फत संबंधित गुत्तेदारास सूचना द्याव्यात आणि या रोडचे काम त्वरित पूर्ण करावे अशी मागणी त्यांनी केली आहे.

# मुप्टा जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शिरसमार्ग येथे शरद मगर यांचा सत्कार




**बीड । प्रतिनिधी**

मुप्टा शिक्षक संघटना बीड जिल्हा जिल्हाध्यक्षपदी शरद दुष्यंत मगर यांची निवड झाल्याबद्दल श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने संस्थेचे सचिव मा सुभाषराव पवळ व समर्थ विद्यालय शिरसमार्ग शाळेतील सर्व कर्मचारीच्यावतीने यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव मा.सुभाषराव पवळ माजी मुख्याध्यापक मोहनराव पवळ,भारत तांबारे,भारत मगर ,बेद्रे सर काशीद सर ,दाभडगावकर सर शिंदे सर ,आहेर सर जमदाडे सर टाकसाळ सर,कारंडे सर कात्रजकर सर ,खोसे सर, सचिन रडे ,बाबु रडे ,अशोक चिखले यांची उपस्थिती होती.

# दिव्यांग सेवेपेक्षा कुठलीच सेवा श्रेष्ठ नाही -अँड. दयानंद लोंढाळ

## शालेय दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दिव्यांग, अपंगाची सेवा यासारखी कोणतीही सेवा श्रेष्ठ नाही असे स्पष्ट मत श्री योगेश्वरी पतसंस्थेचे संचालक ऍड.दयानंद लोंढाळ यांनी व्यक्त केले. ते लोकनेते स्व. विलासरावजी देशमुख तसेच लोकनेते माजी आमदार स्व. बाबूरावजी आडसकर यांच्या पुण्यस्मरण निमित आयोजित स्मृती सदभावना समारोहात प्रियदर्शनी क्रीडा सांस्कृतिक व व्यायाम मंडळ तसेच श्री योगेश्वरी पतसंस्थेच्या वतीने शालेय दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात श्री योगेश्वरी पतसंस्थेचे अध्यक्ष माणिक वडवनकर, जेष्ठ संचालक ब्रम्हचारी इंगळे, संचालक रुपेश चव्हाण, जावेद गवळी, ऍड.दयानंद लोंढाळ, सय्यद अमजद यांच्यासह सर्व संचालक मंडळ तसेच संस्थेचे सचिव गजानन कुलकर्णी हे उपस्थित होते. यावेळी मानव विकास मतिमंद व अपंग विद्यालयातील सर्व विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक आनंद टाकळकर यांनी केले.

या कार्यक्रमात पतसंस्थेचे तज्ञ संचालक ऍड.दयानंद लोंढाळ म्हणाले की, प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री योगेश्वरी पतसंस्थेच्या वतीने गरीब होतकरू तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेश तसेच शैक्षणिक साहीत्य वाटप करण्यात आले. योगेश्वरी पतसंस्था ही केवळ अर्थकारण न करता समाजसेवेसाठी देखील सदैव अग्रेसर असल्याचे सांगून पतसंस्था ही समाजसेवेचा वसा घेऊन वेळोवेळी समाजातील उपेक्षित वर्गाच्या मदतीला धावून गेली असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात मानव विकास अपंग, मतिमंद निवासी विद्यालय तसेच मातोश्री वसतिगृह येथील १६० च्या वर विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात मानव विकास विद्यालयातील सर्व शिक्षक,कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# बीड विधानसभा मतदारसंघात सर्कलनिहाय आरोग्य शिबिर घेणार : डॉ.योगेश क्षीरसागर



## चौसाळा येथे आरोग्य शिबिरात १ हजार २६१ रुग्णांची तपासणी; ७४३ रुग्णांना चष्मे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

दि.१४ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने बीडमध्ये नुकतेच मोफत आरोग्य शिबिर घेतले. त्या शिबिराला मिळणारा प्रतिसाद आणि रुग्णांची निकड लक्षात घेता बीड विधानसभा मतदारसंघात ग्रामीण भागात सर्कलनिहाय मोफत आरोग्य शिबिर घेणार आहोत, अशी माहिती पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

बीड तालुक्यातील चौसाळा येथील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या प्रांगणात बुधवारी (दि.१४) सकाळी ११ ते ५ या वेळेत मोफत आरोग्य शिबिर पार पडले. शिबिराचे उद्घाटक म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर पंचायत समितीचे माजी सभापती काकासाहेब जोगदंड, माजी सदस्य सुनील झोडगे, नेत्ररोग तज्ञ डॉ.प्रवीण शिरुडे, डॉ.सुलेमान शेख, डॉ.रंगनाथ काळे, डॉ.दीप जाधव, डॉ.संजय रंधे पाटील, डॉ.अजय कुटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल हांगे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, बोरखेडचे सरपंच सुनील अनपट, अशोक सोनवणे, गणेश काकडे, रवी वेदपाठक, गंगाधर जाधव, राजाभाऊ क्षीरसागर, संतोष तांदळे, बबलू शिंदे, कुमार मिटकरी, पंकज शिंदे, कुमार जाधव, तानाजी थोरात, जेबा पिंपरीचे माजी सरपंच सहदेव चौधरी, प्रा.पंडित गुंजाळ, अभिमान येडे, पांडुरंग येडे, मंगळाजी येडे, बबलू थोरात आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, ग्रामीण भागात आरोग्याच्या अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहे. बीडमध्ये झालेल्या आरोग्य शिबिरातील शेकडो रुग्णांवर शस्त्रक्रिया केल्या. काही शस्त्रक्रिया शासनाच्या योजनेतून होत नसल्या तरी खाजगी रुग्णालयातून करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या सूचनेनुसार ग्रामीण भागात आरोग्य शिबिरे घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार चौसाळा येथे सर्कलमधील रुग्णांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले. रुग्णांची तपासणी करून उपचार केले जातील. आवश्यकतेनुसार रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यासाठी सर्वोतपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही देत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शिबिरात आरोग्य सेवा देणाऱ्या डॉक्टरांचे आभार मानले. यावेळी शिबिरात १ हजार २६१ रुग्णांची तपासणी केली असून ६७ रुग्णांची शस्त्रक्रिया केली जाणार आहे. तसेच, ७४३ रुग्णांना चष्मे वाटप केले आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.विलास भिल्लारे, सूत्रसंचलन प्रा.सुधीर माने यांनी केले. आभार डॉ.सुदर्शन अवस्ती यांनी मानले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार, रुग्णांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी;67 रुग्णांवर होणार शस्त्रक्रिया


आरोग्य शिबिरात तब्बल १ हजार २६१ रुग्णांची तपासणी केली. त्यापैकी ६७ रुग्णांवर शस्त्रक्रिया होणार आहे. शिबिरात रुग्णांची ब्लड प्रेशर, शुगर, हृदय, ईसीजी तपासणी करून ठराविक औषधे मोफत देण्यात आली. डोळे तपासणीनंतर ७४३ रुग्णांना अल्प दरात चष्मे देण्यात आले. आवश्यकतेनुसार सोयीसुविधायुक्त रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रिया मोफत करून दिल्या जाणार आहेत.

# सेंट झेवियर स्कूलच्या मनस्वी शिंदेची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड विद्या पोपळघट व अर्णव माने यांचीही निवड

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील शालेय बुद्धिबळ स्पर्धेत १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या गटात तालुका स्तरावर प्रथम आली आहे. ही जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली असून या स्पर्धेत ती गेवराई तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी गेवराई तालुका शालेय क्रीडा स्पर्धा, बीड जिल्हा क्रीडा संचालनालय व गेवराई गटविकास अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ क्रीडा स्पर्धा सेंट झेवियर्स स्कूल गेवराई या शाळेत पार पडल्या. या क्रीडा स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनींनी



सहभाग घेतला होता. मुलींच्या १४ वर्षे वयोगटात झालेल्या बुद्धिबळ स्पर्धेत सेंट झेवियर्स स्कूलच्या इयत्ता सातवीत शिक्षण घेत असलेल्या मनस्वी दिनकर शिंदे हिने चाणाक्ष पद्धतीने डावपेच टाकत प्रतिस्पर्धी खेळाडूचा पराभव करून तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. १४ वर्षातील गट (मुली) यात मनस्वी दिनकर शिंदे हिच्यासह विद्या शिवप्रसाद पोपळघट आणि मुलांच्या गटा मध्ये अर्णव माने या सेंट झेवियर्सच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. गेल्या वर्षी मनस्वी शिंदे हिची बहीण मृणाल दिनकर शिंदे हिनेही १७ वर्षा आतील मुलींच्या गटात परळी येथे झालेल्या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत गेवराई तालुक्याचे प्रतिनिधित्व केले होते. यशस्वी खेळाडूंना शरद साळवे यांनी मार्गदर्शन केले जिल्हास्तरीय होणाऱ्या बुद्धिबळ स्पर्धेसाठी वरील विद्यार्थ्यांसह बुद्धिबळ स्पर्धेच्या विविध गटात तालुक्यातील इतर शाळेची काही विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. आता हे सर्व विद्यार्थी जिल्हास्तरीय स्पर्धेत गेवराई तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे प्राचार्य फादर पीटर खंडागळे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल भालेकर, कलाविष्कार प्रतिष्ठानचे कार्यवाहक पत्रकार दिनकर शिंदे, पर्यवेक्षक दीपक देशपांडे, विजय भोसले, जितेंद्र गायकवाड, ब्रदर स्वप्निल आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## पाटोद्यात मोकाट कुत्र्याचा सुळसुळाट २५ च्या टोळक्याने कुत्रे फिरत आहेत शहरात नगरपंचायत ने बंदोबस्त करावं मागणी

पाटोदा । प्रतिनिधीपाटोदा शहरात सध्या मोठ्या प्रमाणात मोकाट कुत्र्याचा संचार दिसत असून अनेक कुत्रे दुचाकी वाहनांना आडवी येत असल्याने मोटरसायकलचे अपघात घडत आहेत तसेच लहान शाळकरी मुलांना शाळेत पाठवण्यास या कुत्र्यामुळे धोका निर्माण झालेला आहे यामुळे नगरपंचायतने त्वरित या मोकाट कुत्र्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी जनतेतून होत आहे पाटोदा शहरातील सार्वजनिक ठिकाणावर भटक्या कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून यामुळे नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे २५ च्या टोळक्यांनी हे कुत्रे चौका चौकात संचार करीत असतात हे कुत्रे दुचाकी स्वारास आडवे जात असल्यामुळे अनेक मोटरसायकलचे अपघात झालेले आहेत विशेष गांभीर्यपूर्वक बाब अशी आहे की लहान मुलांना पालक शाळेत एकटे पाठविने म्हणजे धोकादायक झालेले आहे कारण हे मोकाट कुत्रे लहान बालकाच्या कधी अंगावर धावून जातील हे सांगता येत नाही कुत्र्यांनी अनेकलहान मुलाला चावा घेतलेला आहे अनेक कुत्रे जखमी अवस्थेत सुद्धा फिरत आहे कुत्रे जखमी असल्यामुळे ते कधी पिसाळतील हे सांगता येत नाही यामुळे वेळीच नगरपंचायतने या कुत्र्याचा बंदोबस्त करणे अत्यंत गरजेचे आहे . या भटक्या कुत्र्यांचा उपद्रव रोखण्यासाठी नगरपंचायत अधिकाऱ्यांनी उपाययोजना कराव्यात अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. भटक्या कुत्र्य चावल्यामुळे अनेकांना रेबीज हा महाभयंकर रोग होण्याचा संभव आहे पाटोदा शहरात दर वर्षी जवळपास दीडशे ते दोनशे लोक हे मोकाट कुत्र्याच्या चाव्या मुळे रिबीचे इंजेक्शन घेत असतात विशेष म्हणजे पाटोदा ग्रामीण रुग्णालयात अनेक वेळा रिबीजची लस नसल्यामुळे रिबीज इंजेक्शन घेण्याकरता नागरिकांना बीड किंवा अंबाजोगाई या ठिकाणचे रुग्णालयात जावे लागते या मोकाट कुत्र्याचा विषय अनेक वेळा चर्चेला जातो मात्र नगरपंचायत चे अधिकारी पदाधिकारी हे मूग गिळून गप्प बसलेले असतात नगरपंचायत प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे पाटोदा नगरपंचायतीने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी उपाय योजना त्वरित राबवावी अशी जनतेतून मागणी होत आहे

# शिस्वराज्य यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

**केज । सचिन भालेराव**



राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्रजी पवार पक्षाच्या शिवस्वराज्य यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन तालुका अध्यक्ष शंकर जाधव यांनी केले आहे.

दि. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्रजी पवार यांची शिवस्वराज्य यात्रा केज येथे येणार आहे. त्यांच्या सोबत प्रदेशाध्यक्ष जयंतरावजी पाटील, खासदार अमोल कोल्हे, संसदरत्न सुप्रियाताई सुळे, आ. अनिलजी देशमुख, खा. बजरंग सोनवणे, जिल्हाध्यक्ष आ. संदीप क्षिरसागर यांच्यासह पक्षाचे नेते उपस्थित राहणार आहेत. ही शिवस्वराज्य यात्रा अंबाजोगाई-केज मार्गे येत आहे. त्या निमित्त केज येथील तिरुपती मंगल कार्यालय येथे कार्यक्रम आयोजित केला असून सकाळी १०:०० ते सायंकाळी ६:०० वाजे पर्यंत कार्यक्रम आयोजित केले आहेत. या कार्यक्रमाला तालुक्यातील पक्षाचे नेते, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन तालुका अध्यक्ष शंकर जाधव यांनी केले आहे.

# रामपुरी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनीची दिल्ली परेडसाठी निवड

## स्वातंत्र्यदिनी होणार राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात भव्य दिव्य परेड

**गेवराई । प्रतिनिधी**

देशाची राजधानी असलेल्या दिल्ली येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त होणारा ध्वजारोहण सोहळा व त्यानंतर राष्ट्रभक्ती राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात होणारी भव्य दिव्य परेड पाहण्याची प्रत्येकाचीच इच्छा असते. मात्र, सर्वांनाच ही संधी मिळत नाही. परंतू जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रामपुरी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या इयत्ता दहावीतील विद्यार्थीनी कु.सलोनी भरत घटे हिला ही संधी मिळाली आहे.



बीड जिल्ह्यात गेवराई तालुक्यातील रामपुरी हे अतिशय दुर्गम भागातील गाव आहे. या गावात जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाची इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंत शाळा आहे. या शाळेतील विद्यार्थिनी कु. सलोनी भरत घटे हिला दिल्ली येथे होणाऱ्या ध्वजारोहण सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले आहे. तिच्यासोबत शाळेच्या सहशिक्षिका श्रीमती प्रीती जगदीश गायकवाड या देखील सहभागी झाल्या आहेत. तर दि.13 ऑगस्ट ते दि.17 ऑगस्ट असा त्यांचा दिल्ली दौरा असणार आहे. तर महाराष्ट्रातून दिल्ली परेडसाठी वीस विद्यार्थ्यांचा समावेश असणार आहे.

केंद्रीय नवोदय अंतर्गत घेण्यात आलेल्या प्रेरणा परिक्षेतून या विद्यार्थीनीची निवड करण्यात आली. प्रेरणा परीक्षेसाठी शाळेतून तिची निवड झाली आहे. लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे तिची निवड करण्यात आली आहे. याबद्दल तिचे जय भवानी व जगदंबा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी शिवाजीराव दादा पंडित, जय भवानी व जगदंबा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमरसिंह पंडित साहेब, सचिव जयसिंह पंडित, माजी जि.प अध्यक्ष विजयराजे पंडित, युवा नेते पृथ्वीराजे पंडित, शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, अमृत डावकर, प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, उपप्रशासकीय अधिकारी काशीनाथ गोगुले, प्राचार्य अशोक तौर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त राष्ट्रध्वज फडकवत नशामुक्त भारताचा संकल्प केला.

## फडकवुया घरोघरी, अशोक चक्रांकित तिरंगा नशामुक्त जीवन ही चंगा




मुंबई : सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, समाजकल्याण आयुक्तालय, प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण विभाग, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण विभाग मुंबई शहर, किन्नर माँ व नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्ताने "फडकवुया घरोघरी अशोक चक्रांकित तिरंगा, नशामुक्त जीवन ही चंगा, अमृत महोत्सवी स्वातंत्र्याचा क्षण, आमचा नशामुक्त भारताचा प्रण" हा संदेश देण्याच्या उद्देशाने १४ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी ०३.०० ते ०४.३० वाजेपर्यंत सिएसएमटी बस डेपो बाहेर, मुंबई येथे सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण विभाग यांनी नशा मुक्त भारताचा संदेश दिला. "भारताचा राष्ट्रध्वज देशाच्या नागरिकांना एकजूट करीत राष्ट्र सेवेसाठी प्रेरणा देते" असे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, मुंबई शहर चे पुष्पलता घटारे यांनी आपल्या शुभ संदेशात म्हटले होते. नशामुक्त भारत अभियानाची प्रस्तावना करत अमोल स. भा. मडामे यांनी देशभरात चाललेल्या व्यसनमुक्तीच्या कार्याची माहिती दिली. सदर कार्यक्रमात समाजकल्याण विभागाचे अधिकारी, कर्मचारी वृंद यांनी उपस्थित राहुन कार्यक्रमात सहभाग घेतला तर कार्यक्रमाचे आकर्षण म्हणुन स्वातंत्र्यामुळे प्राप्त झालेल्या अधिकारांमुळे मिळवलेल्या भारतमाता, न्यायाधिश, वकील, डॉक्टर, नर्स, पोलीस, आरोग्य सेवक, वैमानिक, इंजिनियर यशस्वी व्यक्तीमत्वांची मांडणी तृतीयपंथी साथी वेगवेगळ्या वेशभुषा करुन सादरीकरण करुन उपस्थितांचे लक्ष वेधले. तसेच नशा - एक नाश हे पथनाट्य सादर करून लोकांचे लक्ष केंद्रित केले. किन्नर माँ ट्रस्ट चे सलमा खान यांनी 'किन्नर समाजास संविधानामुळे प्रत्येक क्षेत्रात प्रगती करत आहे. तिरंगा सर्वांना एक समान संधी व देशभक्ती ची भावना निर्माण करते असे सांगितले. डॉ. गौरवी मिश्रा, प्रतिबंधात्मक ऑन्कोलॉजी विभाग, टाटा मेमोरियल हॉस्पिटल, परेल, मुंबई व डॉ. ज्योती बाजपेयी, मेडिकल ऑन्कोलॉजी, अपोलो हॉस्पिटल यांनी कार्यक्रमात उपस्थितांना व्यसनांमुळे कर्करोग आणि समूह आजारांची माहिती देत त्यापासून परावृत्त होण्यासाठी मार्गदर्शन केले. पार्श्वगायक नंदू बनसोडे यांनी देशभक्ती व व्यसनमुक्ती वर गीत सादर करून भावनिक वातावरण निर्माण केले. व्यसनमुक्तीच्या भव्य पोस्टर्स प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण होते. त्यावेळी नशाबंदी मंडळाचे उपाध्यक्ष श्री. एकनाथ तांबवेकर यांनी उपस्थितांना व्यसनमुक्तीची शपथ दिली. त्यावेळी व्यसनमुक्ती प्रचार पत्रकांचे वाटप करण्यात आले. सदरच्या व्यसनमुक्ती व स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवी कार्यक्रमाला मुंबईकरांनी भरघोस प्रतिसाद देत सहभाग देऊन व्यसनमुक्तीचा संकल्प केला. नशाबंदी मंडळाच्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास यांनी मान्यवरांचे आभार व्यक्त करत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या सदिच्छा व्यक्त केल्या तर सूत्रसंचालन नशाबंदी मंडळाचे सदस्य बॉस्को डिसुझा यांनी केले.

# कृषिमंत्री धनंजय मुंडेंच्या नेतृत्वात विभागाचे सूक्ष्म नियोजन; यंदा गोगलगायींचे संकट नियंत्रणात

## २८ जिल्ह्यात २५० मे.टन मेटाल्डिहाईडचा पुरवठा, गोगलगायीमुळे होणारे संकट टळले

**आष्टी प्रतिनिधी :-**
मुंबई (दि. 05) - 2022 व 2023 च्या खरीप हंगामामध्ये गोगलगायींनी पिकांच्या केलेल्या नुकसानीच्या अनुषंगाने यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीपासून राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात कृषी विभागाने केलेल्या सूक्ष्म नियोजनाचे फलित म्हणून यावर्षी गोगलगायीचे संकट पूर्णतः नियंत्रणात आले आहे. सन 2022 आणि 2023 या वर्षांमध्ये राज्यामध्ये बहुतांशी विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये गोगलगायीच्या प्रादुर्भावामुळे अनेक शेती पिकाचे आणि फळ पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यामध्ये जास्त नुकसान बीड, धाराशिव, लातूर, बुलढाणा, यवतमाळ आदी जिह्यामध्ये नुकसानीचे प्रमाण अधिक होते. इतरही बऱ्याच जिल्ह्यामध्ये कमी अधिक प्रमाणात नुकसान झाले होते. लातूर, बीड आणि धाराशिव



या तीन जिल्ह्यामध्ये 33 टक्के पेक्षा जास्त शेत पिकाचे आणि फळ पिकाचे नुकसान झाले, त्यांचे क्षेत्र 72490 हेक्टर होते तर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या 129,596 इतकी होती. राज्यामध्ये गोगलगाय मुळे नुकसान होण्याची समस्या साधी होती. परंतु अलीकडील काही वर्षांमध्ये ही समस्या प्रमुख होत गेली. या बाबीची दखल घेत राज्याचे कृषिमंत्री श्री धनंजय मुंडे यांनी याबाबत प्रभावी उपाययोजना करण्याबाबत सूचना दिल्या आणि कृषी विभागाने याची दखल घेत राज्य पुरस्कृत सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ आणि मूल्य साखळी प्रकल्पाअंतर्गत राज्यांमध्ये 28 जिह्यामध्ये 250 मे.टन मेटाल्डिहाईड या गोगलगाय नाशकाचा पुरवठा करण्यात आला. त्यामुळे यंदाच्या खरीप हंगामामध्ये या बाबीची प्रभावी आणि काटेकोर अंमलबजावणी करण्यात आली. त्याचाच परिणाम म्हणून 2024 च्या खरीप हंगामामध्ये गोगलगायीचा प्रादुर्भाव पूर्ण नियंत्रणात आणला गेला. या यावर्षीच्या खरीप हंगामात चांगला पाऊस झाल्यामुळे पीक परिस्थिती चांगली असून गोगलगायीचा प्रादुर्भाव नगण्य असल्यामुळे राज्यामध्ये कृषि मालाचे उत्पादन उच्चांकि असेल् अशी भावना शेतकऱ्यांमध्ये तयार झाली आहे. राज्यातील आणि विशेष करून लातूर, बीड, धाराशिव आदी जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी कृषी विभाग आणि कृषी मंत्री धनंजय मुंडे यांचे अभार व्यक्त केले आहेत.

# सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार सीएस यांनी बोगस पॅथॉलॉजी लॅब धारकांवर बंदी घालावी अन्यथा मनसेचे आंदोलन

मनसेच्या प्रमुख मागण्या
-डिजिटल सही बंद करून स्वतः च्या निगराणीत तपासण्या करून डॉक्टर रिपोर्ट वर सह्या करणे आवश्यक.
-नोंदणीशिवाय चालणाऱ्या लॅबवर फौजदारी कार्यवाही करण्यात यावी तसेच दंड आकारण्यात यावा.
-बोगस लॅब शोधण्यासाठी फिरते पथकही स्थापन करण्यात यावे.
महाराष्ट्र पॅरा मेडीकल कौन्सिलच्या माहितीनुसार डी.एम.एल.टी.कोर्स धारकांची फक्त नोंदणी करुन घेतली जाते ना की त्यांना लॅब चालवण्यासाठी परवानगी दिली जाते याची नोंद घ्यावी

बीड (प्रतिनिधी)- गेल्या महिनाभरापुर्वी मनसे ने केलेल्या स्टिंग ऑपरेशन नंतर लॅब चालकांनी डीएमएसलटी कोर्स पुर्ण आहे का नाही याची माहिती यासठी जिल्हा शल्यचिकिस्तक यांनी काढलेल्या पत्रकाची शहरातील डॉक्टरांनी कसलीही दखल न घेतल्याने त्यांच्याविरोधात कठोर कायदेशीर कार्यवाही अन्यथा मनसे तीव्र आंदोलन करणार असल्याचे जिल्हा सचिव सोमेश कदम, शहर अध्यक्ष करण लोंढे,जिल्हा अध्यक्ष विध्यार्थी सेनेचे ऋषिकेश गिराम पाटील यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दिनांक 23-07-2024 रोजी जिल्हा शल्य चिकित्सक यांनी काढलेल्या पत्रकानुसार आत्तापर्यंत सर्व डीएमएलटी कोर्स धारकांनी अजून पर्यंत कोणतेही डॉक्युमेंट जमा केलेले नाहीत आणि हे फक्त शहरापुरते मर्यादित नसून पूर्ण जिल्हा भरातील लॅब च्या माहिती घेणे अपेक्षित होते परंतु असे न होता फक्त शहरामधले आणि तेही अपूर्ण माहिती जमा झालेली आहे अशी माहिती डॉ.दीपाली कट्टे यांनी दिली त्या अनुषंगाने मनसेच्या वतीने पॅथॉलॉजी लॅब दि.17-09-2010 रोजी सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशानुसार लॅब चालवण्याचा अधिकार हा फक्त एम.बी.बी.एस.नंतर 03 वर्षांचा पॅथॉलॉजी कोर्स पूर्ण केलेल्या डॉक्टरांनाचं आहे व डी.एम.एल.टी टेक्निशियन हे फक्त सहाय्यक म्हणून त्यांच्यासोबत काम करू शकतात आणि रिपोर्ट देण्याचे अधिकार हे फक्त जे पॅथॉलॉजिस्ट स्वतःच्या निगराणी मध्ये तपासण्या करून रिपोर्टवर सह्या करतात त्यांनाच देण्यात यावा व या गोष्टींची दखल घेण्यात यावी तसेच मनसेने केलेले स्टिंग ऑपरेशनच्या दरम्यान जमा असलेले पुरावे सोबत जोडून लॅबचालकांवर कारवाई करण्याची मागणी केली तसेच येत्या पंधरा दिवसात सुप्रीम कोर्टाच्या आदेशनुसार कारवाई न झाल्यास व त्यांच्या आदेशनुसार लॅब चालवण्याचे अधिकार ज्यांना आहेत अशा डॉक्टरांव्यतिरिक्त बाकी सर्व लॅब वर बंदी न आणल्यास आरोग्य प्रशासनाच्या विरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल याला सर्वस्वी आरोग्य प्रशासन जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

**स्वातंत्र्यदिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी**

# रोटरी क्लब ऑफ बीड आणि मातोश्री हॉस्पिटलचा उपक्रम

बीड : प्रतिनिधी स्वातंत्र्यदिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ बीड व मातोश्री हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. उद्या दि.15 रोजी सकाळी 10 4 या वेळेत शहरातील तुळजाई चौक, कॅनॉल रोड, आशा सिनेफ्लेक्स जवळ असलेल्या मातोश्री हॉस्पिटल येथे हे तपासणी शिबीर होणार आहे. रोटरी क्लब ऑफ बीड व मातोश्री हॉस्पिटल यांच्या वतीने आयोजीत करण्यात आलेल्या या शिबीरात मोफत ईसीजी, टु डी इको, बीएसएल शुगर तपासणी करण्यात येणार आहे. डॉ.अमोल जोगदंड व डॉ.मिनल जोगदंड हे तपासणी करणार असून रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.मेघराज पिंगळे, सचिव रो.संदिप खोड, क्लब ट्रेनर रो.कल्याण कुलकर्णी यांनी केले आहे.

# स्वातंत्र्यदिनी मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते

बीड, दि. 14 (जि. मा. का.) :- भारतीय स्वातंत्र्याचा 78 वा स्वातंत्र्यदिन गुरुवार 15 ऑगस्ट 2024 रोजी आहे या दिवशी बीड जिल्हयाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते होत आहे. जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे गुरुवार 15 ऑगस्ट रोजी सकाळी 9 वाजून 5 मिनिटानी मुख्य ध्वजारोहण होईल. या समारंभास सर्व नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

या सोहळयात सहभागी होणा-या सर्वांनी राष्ट्रीय पोशाख धारण करावा तसेच 8.45 वाजेपूर्वी या ठिकाणी उपस्थित रहावे असेही आवाहन करण्यात आले आहे. या समारंभापूर्वी व नंतर अर्धा तास या कालावधीत इतर कोणताही सोहळा आयोजित करु नये, असेही आवाहन करण्यात येत आहे.

जिल्हा परिषद

बीड जिल्हा परिषद येथे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. हा कार्यक्रम सकाळी 7.45 वाजता होत आहे. याला सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे यांनी केले आहे.

# गोसावी गुरव समाजाच्या इनामजमीन हक्क परिषदेला मोठी गर्दी संघटीत रहा न्याय मिळेल: ओमप्रकाश गिरी

**बीड । प्रतिनिधी**
बीड, :- येथील शासकीय विश्रामगृहावर आयोजित केलेल्या मराठवाड्यातील गोसावी गुरव समाज इनाम जमीन हक्क परिषदेला मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी मराठवाडा संयोजक ओम प्रकाश गिरी यांनी गोसावी गुरव व ईतर समाजातील ईनामदारांनी जागृत होऊन संघटीत शक्ती दाखवावी असे आवाहन केले. गोसावी गुरव व ईतर समाजातील इनामदार यांच्या उपस्थितीत आयोजित केलेल्या मराठवाडा स्तरीय इनाम जमीन हक्क परिषदेला मराठवाडा प्रमुख ओमप्रकाश गिरी, दत्ता महाराज




गिरी, राजेंद्र बन यांच्यासह आठही जिल्ह्यातील लोक उपस्थित होते. परिषदेत सर्वानुमते मराठवाड्यातील स्वांतंत्र्यपूर्व काळातील देवस्थान इनामी जमिनी खालसा अथवा वर्ग 1 मध्ये रूपांतरित कराव्यात यासाठी एकमताने ठराव मांडण्यात आला. यावेळी पुढे बोलताना ओमप्रकाश गिरी म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळात एकूण सात इनाम जमिन प्रकार अस्तिवात होते. त्यापैकी चार इनाम प्रकार 1960 पूर्वी तत्कालीन शासनाने खालसा केली आहेत. देवस्थान इनामी जमिनी ह्या खिदमत, मदतमास म्हणून ओळखल्या जातात. अशा देवस्थान इनामी जमिनीचे महाराष्ट्र राज्यातील अंदाजे क्षेत्र 30 ते 40 हजार हेक्टर एवढे आहे. या जमिनी गावातल्या मुख्य देवस्थानच्या दैनंदिन पुजाअर्चा देखभालीसाठी, उत्सवसाठी तसेच पुजारी कुंटूबांचा उदरनिर्वाह चालवा यासाठी निरंतर कायम स्वरूपी बहाल केलेल्या आहेत. परंतू अनेक कारणांमुळे इनामधारक मुळ उद्देशापासून वंचित आहे. त्याला कुंटूबांचा उदरनिर्वाह तसेच देवस्थानची दैनंदिन पुजाअर्चा, उत्सव व देखभालीसाठी असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या परिस्थित गोसावी गुरव समाजातील इनामदारांनी संघटीत होऊन आपले प्रश्न शासन दरबारी मांडले पाहीजेत. आपण सारे संघटीत झालो तरच सर्वांना न्याय मिळेल, असे ते म्हणाले.

इनाम हक्क परिषदेच्या यशस्वीतेसाठी विश्वंभर गिरी, रवी बन, बाजीराव गिरी, सिद्धेश्वर गिरी, विवेकानंद गिरी, सचिन गिरी, महेश गिरी यांनी परिश्रम घेतले.

मुख्यमंत्र्यांची भेट घेणार
परिषदेत देवस्थान, इनाम जमिनी विकासासाठी शासनाने महामंडळ स्थापन करावे अशा मागण्या इनामदार यांच्या वतीने करण्यात आल्या. यासाठी राज्यस्तरावर संघटन मजबूत करून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री यांच्यासोबत चर्चा करण्याचे ठरले.

# जिल्हा शासकीय ग्रंथालयाच्या इमारतीचे पालकमंत्र्यांच्या हस्ते आज भूमिपूजन

## ४.८६ कोटी खर्चून साकारणार चौथे डिजिटल ग्रंथालय

### भूमीपूजन कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून यांची उपस्थिती

राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे उद्धाटक म्हणून लाभले आहे. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून खा. रजनी पाटील, खा.बजरंग सोनवणे,आ. श्रीमती पंकजा मुंडे, , आ.सतीश चव्हाण, आ. विक्रम काळे, प्रकाश सोळंके, आ. लक्ष्मण पवार, आ. संदीप क्षीरसागर, आ. बाळासाहेब आजबे, आ. श्रीमती नमिता मुंदडा,जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील, ग्रंथालय संचालक मुंबई अशोक गाडेकर, गजानन कोटेवार, डॉ.रामेश्वर पवार, सुनील हुसे, राम मेकले, सुधीर चाटे व इतर या सर्वांची उपस्थिती राहणार आहे.

**बीड, प्रतिनिधी):-**
बीड, दि. 14 , बीड जिल्ह्यासाठी उभारण्यात येणार असलेल्या शासकीय जिल्हा ग्रंथालय इमारतीचे भूमिपूजन उद्या 15 ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी राज्याचे कृषी मंत्री व बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते होणार आहे राज्यात होणारे 4 थे डिजिटल ग्रंथालय ठरणार आहे. येथील सर्व्हे क्र 34,सहयोग नगर, शासकीय गोदाम, जालना रोड बीड येते हे ग्रंथालय उभारण्यात येणार आहे. याची उभारणीसाठी पालक मंत्री धनंजय मुंडे आणि जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनात जिल्हा विकास निधीतून 4 कोटी 86 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालय यांच्या अधिपत्याखाली जिल्हा ग्रंथालय कार्यरत आहे.याबाबत अधिक माहिती अशी की बीडमध्ये जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय बीड याची स्थापना 2005 साली नगर रोड बीड येथे एका भाड्याच्या जागेत झाली. वर्षानुवर्षे या ग्रंथालयामध्ये हजारो संख्येने शालेय विद्यार्थी. एमपीएससी, यूपीएससी स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी तसेच वकील, शासकीय अधिकारी, कर्मचारी व जेष्ठ नागरिक सभासद असून ग्रंथालयातील सुविधेचा उपयोग करीत आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता सकाळी 8:00 ते संध्याकाळी 8:00 वाजेपर्यंत हे ग्रंथालय सुरू राहते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाची वाचनीय साहित्य



व सुविधा उपलब्ध करून देतात. एमपीएससी, यूपीएससी इतर स्पर्धा परीक्षा तयारी करणारे विद्यार्थी त्याचबरोबर व्यावसायिक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी यांना उत्कृष्ट दर्जाचे डिजिटल सुविधा प्राप्त व्हावी यासाठी या जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांनी जिल्हा प्रशासनाकडे कार्यालयाच्या नवीन स्वतंत्र इमारतीसाठी प्रस्ताव दिले होते. संजय मस्के राज्याचे कृषी मंत्री तथा पालक मंत्री धनंजय मुंडे व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन स्वतंत्र इमारतीसाठी 4.86 कोटींचा निधी मंजूर करून घेतला. जिल्हा प्रशासनाने या ग्रंथालयाच्या स्वतंत्र इमारतीसाठी 20 हजार चौ. फूट जागेची संमती दिली असून एवढ्या प्रचंड जागेत 16 हजार चौ. फूट अशा भव्य दोन मजली इमारतीचे बांधकाम होणार आहे. ग्रंथालयामार्फत विद्यार्थ्यांना मोफत डिजिटल सुविधा व इतर सुविधा विद्यार्थ्यांसाठी 25 संगणक, मोफत वायफाय, गॅजेट्स, 22 प्रकारची वर्तमानपत्रे, 150 हून जास्त नियतकालिके 47 हजारांहून जास्तीची पुस्तके, ग्रंथ तसेच कादंब-या उपलब्ध आहेत. त्याचबरोबर ग्रंथालयाचे सभासदसाठीसुद्धा वर्तमानपत्रे, मासिक नियतकालिके, ग्रंथ, कादंब-या, रिसर्च पेपर, कोर्ट निकाल, जागतिक माहिती अशा प्रकारे अजून बरेच काही सुविधा उपलब्ध केलेले आहेत. या सर्व गोष्टींचा फायदा घेण्यासाठी नागरिकांना ग्रंथालयाचे सभासद व्हावे लागेल. हे सभासदतत्व दोन वर्षासाठी फक्त 610 रुपयात होते. तसेच मुले व मुलींच्या सोयीसाठी वेगवेगळे विभाग उपलब्ध आहे. जसे वर्तमानपत्र विभाग, डिजिटल विभाग, जेष्ठ नागरिक विभाग, जनरल वाचन कक्ष विभाग, गटचर्चा विभाग, एमपीएससी विभाग, यूपीएससी विभाग या सर्व विभागांचे मुले व मुलींची वेगवेगळ्या स्वतंत्र विभाग आहे. वरील सर्व बाबी गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी मोफत सुविधा देऊन जास्ती जास्त विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत समावेश व्हावा व सुजाण व चांगला नागरिक घडावा हाच ग्रंथालयाचा प्रमुख उद्देश आहे.

# जरांगेंना राजकीय भुताने पछाडलेय
# भाजपा गटनेते प्रविण दरेकरांची टीका




- जरांगे यांच्यावरील राजकारणाचे भूत काही उतरायला तयार नाही. मूळ आरक्षणाचा विषय सोडून केवळ राजकीय भाषा जरांगे गेले महिनाभर बोलताना दिसताहेत. आता तर ते सरकारच्या लाडक्या बहीण योजनेवर बोलायला लागलेत. त्यांना राजकीय भुताने एवढे पछाडले आहे की, ही योजना कशी चुकीची आहे, योजना म्हणजे निवडणुकीत पैसे वाटणे आहे. जरांगे शंभर टक्के राजकीय झालेत, अशी टीका भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी केली. ते पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी बोलताना दरेकर म्हणाले की, इथे घुसू, तिथे घुसू... जरांगे आम्ही असल्या धमक्यांना भीक घालत नाही. कधीही घुसा आम्ही तयार आहोत. जो काही अहंकार आलाय. आमचा पाराही चढवायला लावू नका. आतापर्यंत व्यक्तिगत आम्ही कधीच बोललो नाही. मराठा समाजासाठी आपण बोला, काम करा. अजूनही सांगतो आम्ही बिनशर्त आपल्या पाठीशी राहू. आपला उदोउदो करू. पण उठसुठ देवेंद्र फडणवीसांना एकेरी बोलणार, नारायण राणे, भुजबळांना, प्रसाद लाड यांना बोलणार. कुठल्या संस्कृतीत वावरतोय. मराठा समाजाच्या लोकांना हे अजिबात आवडत नाही याचे जरांगेंनी भान ठेवावे किंबहुना समाजातील लोकांशी बोलावे. तसेच सोशल मीडियात ठेवलेली पेड लोकं, पवारांच्या मार्गदर्शनाखाली पडद्याआडून असणारी त्यांच्या पक्षाची लोकं, त्यांचे तरुण नेतृत्व राजेश टोपे, रोहित पवार असतील. उद्धव ठाकरेंच्या संबंधित असणाऱ्या काही संघटना, हे सगळे लोकं तुमचे सूत्रसंचालन करताहेत. तुमचे आंदोलन पूर्णपणे दुसऱ्याच्या हातात गेलेय. तुमचे आंदोलन स्वतः चालवत नाही आहात. मराठा समाजाच्या भावना समजून घेऊ, समाजाचे मत घेऊ सांगता. समाजाचे मत तुम्ही राजकारण आरक्षणाच्या प्रश्नावर करा असे अजिबात नाही. आम्हीही समाजात वावरतो, समाजासाठी आमचेही काही योगदान असल्याचे दरेकर म्हणाले.

## पाटोदा तहसील कार्यालयांच्या भिंती रंगल्या गुटख्याच्या पिचकाऱ्याने

पाटोदा (गणेश शेवाळे) तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी जात असतात कार्यालयकडे जाणाऱ्या जिन्यातील भिंतींवर व परिसरात कोणीही धूम्रपान अथवा या ठिकाणी थुकू नये असा बोर्ड सुद्धा असतानाही या परिसरातील जिन्याच्या भिंतीवर अनेक ठिकाणी पिचकऱ्या मारलेल्या आढळून येत आहे. तसेच जिन्यातील भिंतीवर कॅमेरा सुद्धा असल्याने या कॅमेरामध्ये थूकणारे व धूम्रपान करण्याऱ्या व्यक्तींवर प्रशासनाने कधी दंडात्मक कारवाई केली आहे का? या ठिकाणी लावलेले फलक व सी.सी.टि.व्ही.कॅमेरा हे शोभेचे वस्तू बनलेले आहे का? असाही सवाल उपस्थित होत आसुन. कार्यालयाच्या इमारतीमध्ये थुंकणाऱ्या व धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींवर तर काही कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी हे सुद्धा धूम्रपान करताना दिसतात.या अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर कारवाई कधी होणार असा मोठा प्रश्न उपस्थित होत आहे.



## संभाजीनगर परिक्षेत्रातील सहा पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

### रघुनाथ नाचण, मजहर सय्यद यांची बीडला बदली अँटीह्युमन ट्रॅफिकिंग युनिटच्या उपनिरीक्षक मनीषा गिरी यांचीही बीडला बदली

**जालना/प्रतिनिधी**

संभाजीनगर परिक्षेत्रातील सहा पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून अंबडचे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचण व घनसावंगीचे पोलीस निरीक्षक मजहर सय्यद यांची बीडला बदली करण्यात आली आहे. अँटीह्युमन ट्रॅफिकिंग युनिटच्या उपनिरीक्षक मनीषा गिरी यांचीही बीडला बदली करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रातील चार पोलीस निरीक्षक आणि दोन पोलीस उपनिरीक्षक यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी आजच आदेश निर्गमित केले आहेत. अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचण आणि घनसावंगी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सय्यद मजहर यांची बीडला बदली करण्यात आली आहे. बीड येथील पोलीस निरीक्षक केतन राठोड यांची जालन्यात बदली करण्यात आली आहे. तसेच, बीड येथे कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक मनीष पाटील यांची धाराशिव येथे बदली करण्यात आली आहे. जालना येथील अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिटच्या पोलीस उपनिरीक्षक मनीषा गिरी यांची बीडला बदली झाली आहे, तर संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस उपनिरीक्षक गणेश जांभळे यांची धाराशिव येथे बदली करण्यात आली आहे.

## नंदकुमार ठाकूर यांना विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्यांनी दिला मनस्वी निरोप

**बीड (प्रतिनिधी)** - पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांची २६ महिन्यानंतर बीड येथून बदली झाल्यानंतर त्यांना दौंडच्या पोलीस प्रशिक्षण केंद्रात प्राचार्य पदी नियुक्ती देण्यात आली आहे. यामुळे विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांनी त्यांना घरी जाऊन मनस्वी निरोप दिला. नंदकुमार ठाकूर हे बीड जिल्हा पोलीस अधीक्षक पदी ८ जून २०२२ रोजी रुजू झाले होते. तेव्हापासून ते ७ ऑगस्ट २०२४ असे २६ महिने ते इथे कार्यरत होते. या २६ महिन्याच्या कार्यकाळात त्यांनी कायदा व सुव्यवस्था अत्यंत संयमाने हाताळली. विचारपूर्वक निर्णय आणि निर्णयानुसार कृती हे त्यांचे स्वभाव वैशिष्ट्य नेहमी उठून दिसले. मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान जाळपोळ निमित्ताने निर्माण झालेली विदारक अवस्था सुद्धा त्यांनी अत्यंत संयमाने हाताळली तसेच




नुकत्याच झालेल्या पोलीस शिपाई भरतीचे नियोजन सुद्धा त्यांनी अत्यंत उत्तमरीत्या केले होते. कधी नव्हे ते भरतीसाठी आलेल्या उमेदवारांच्या राहण्याची आणि जेवणाची सोय सुद्धा त्यांनी उत्कृष्टरित्या केली होती. पोलीस भरतीच्या इतिहासात पहिल्यांदाच पोलीस भरतीसाठी खाजगी फंक्शन हॉल्स सुद्धा त्यांनी उमेदवारांच्या सोयीकरिता घेतले होते. शिवाय त्यांच्याकडे कामे घेऊन येणाऱ्यांकरिता त्यांच्या कार्यालयाचे दालन सर्वांसाठी त्यांनी उघडे केले होते. त्यांच्या अशा कार्यामुळेच त्यांच्यात बीड जिल्हावासियांना फक्त एक पोलीस अधीक्षकच नाही तर पालक सुद्धा दिसायचा. अशा सर्वसामान्यांना हव्याहव्याशा वाटणाऱ्या पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांची ७ ऑगस्ट २०२४ रोजी बदली झाल्याने बीड जिल्हावासियांना हुरहुर लागून राहिली आहे, परंतु अधिकाऱ्यांच्या बदल्या या शासकीय-प्रशासकीय प्रक्रिया असल्याने त्यांनी कितीही चांगले कार्य केले तरी ठराविक काळानंतर त्यांची बदली होतेच होते. आता नंदकुमार ठाकूर जरी बीड जिल्हा पोलीस अधीक्षक पदावरून बदली होऊन जात असले तरी जाताना मात्र ते समस्त बीड जिल्हावासियांच्या प्रेमाची व आपुलकीची शिदोरी सोबत घेऊन जात आहेत. आता त्यांची नियुक्ती दौंड येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रात प्राचार्य म्हणून करण्यात आली आहे. या निमित्ताने त्यांना शासकीय निवासस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार मच्छिंद्र भालेराव, साप्ताहिक द स्कूल एक्सप्रेस चे मुख्य संपादक एजाज़, प्रसिद्ध फोटोग्राफर, साहित्यिक तथा कवी अनंत सुतनासे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी त्यांना पुढील कारकीर्दीसाठी मनस्वी शुभेच्छा देत निरोप दिला.

### बीड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये लोकनेते स्व.विनायकरावजी मेटे यांची पुण्यतिथी साजरी



(बीड प्रतिनिधी) लोकनेते स्व.विनायकरावजी मेटे साहेब यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त बीड कृषी उत्तपन्न बाजार समितीमध्ये आंदरजंली अर्पण करण्यात आली.यावेळी लोकनेते स्व. विनायकरावजी मेटे यांच्या आठवणीना उजाळा देत त्यांनी केलेल्या कार्याची माहीती बीड कृषी उत्तपन्न बाजार समितीचे नवनिवार्चित सचिव यशवंत कदम साहेब यांनी सांगितली यावेळी नवनिवार्चित सचिव यशवंत कदम साहेब,माजी सचिव अशोक वाघीरे,लेखापाल दत्ता बहीर,गणेश घुमरे,राहुल विधाते,शेख कलीम भाई,बाबुराव नांदे,गोरख साबळे,सुग्रीव खांडे,सय्यद अनीस यांच्यासह व्यापारी वर्ग मोठया संख्येने उपस्थीत होते.

## आर्यन ग्रूप तर्फे ज्येष्ठ नागरिकांना मोफत देवदर्शन.



मनुष्य आपल्या कुटुंबासाठी रात्रंदिवस राबराबतो. संपूर्ण आयुष्य त्याचे कष्टात, काम करण्यात जाते. मात्र उतारवयात म्हणजेच म्हातारपण आल्यानंतर ज्येष्ठ नागरिकांचे एकच महत्त्वाची इच्छा असते ती म्हणजे देवदर्शन. हिंदू धर्मात देव दर्शनाला अतिशय महत्त्व आहे. त्यामुळे जेष्ठ नागरिक आपल्या उतार वयात देवदर्शन करून आपल्या कुटुंबाची चांगली प्रगती होवो,कुटुंबातील व्यक्तींना सुख समृद्धी लाभो अशी प्रार्थना करत असतात. उतारवयात असलेल्या ज्येष्ठ नागरिकांची ही व्यथा लक्षात घेऊन ज्येष्ठ नागरिकांचे जाण्या येण्याचा प्रवास सुखकर व्हावा, त्यांना चांगली तीर्थस्थळे बघता यावीत, ज्येष्ठ नागरिकांचा पैसा व वेळेची बचत व्हावी,त्यांना उतार वयात देव दर्शनाचा लाभ मिळावा या अनुषंगाने चिरले उरण येथील आर्यन ग्रुप तर्फे 8 ऑगस्ट २०२४ ते १२ ऑगस्ट २०२४ दरम्यान मोफत देवदर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

दरवर्षी आर्यन ग्रुप तर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत देव दर्शन यात्रेचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी मोफत देवदर्शन यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. एकूण २०० हुन अधिक व्यक्तींनी या मोफत देवदर्शन यात्रेचा लाभ घेतला. पंढरपूर,अक्कलकोट, तुळजापूर, परळी वैजनाथ,औंढा नागनाथ, घृष्णेश्वर, देवगड, रांजणगाव, आळंदी अशा विविध देवदर्शनाचा ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेतला.

सदर देवदर्शन यात्रा यशस्वी करण्यासाठी चिरले ग्रामपंचायतचे सरपंच सुधाकर पाटील,आर्यन ग्रुपचे मालक समीर पाटील तसेच समीर पाटील यांचे सहकारी धोंडू वामन पाटील, मधुकर मढवी,बाबुराव ठाकूर,छाया मढवी,संदीप मढवी,प्रगती घरत यांनी विशेष मेहनत घेतली. मोफत देवदर्शन यात्रा यासारख्या चांगल्या उपक्रमाचे आयोजन केल्याने सर्व ज्येष्ठ नागरिकांनी सरपंच सुधाकर (काका ) पाटील,आर्यन ग्रुपचे मालक समीर पाटील व त्यांचे सहकारी यांचे आभार मानले आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077